# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel:(0253) 2539244/6659244/241/242 Student Helpline:0253-539111/6659111/100

MUHS Website: www.muhs.ac.in, E-mail: planning@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ**
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
**कुलसचिव**

**Dr. Rajendra Shivaji Bangal**
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
**Registrar**


जा.क्र मआविवि/पीबी/युजी/पी-५/९६२६०/२०२४ दि. २६/०९/२०२४

प्रति,

**मा.प्रधान सचिव,**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, नवीन गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर,
संकुल इमारत, लोकमान्य टिळक रोड, मंत्रालय, मुंबई- ४०० ००२.

**विषय**:- माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ, कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड-४०२१०४ या संस्थेचे **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन** प्रस्तावित श्रीमती वीठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज, जिल्हा कोर्ट जवळ, जुने माणगांव, ता.माणगांव,जि.रायगड - ४०२१०४ हे **बी.एस्सी** नर्सिंग महाविद्यालय ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करणेचा प्रस्ताव..

**संदर्भ** :- संस्थेने दि.३१/०७/२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी विहित मुदतीमध्ये दाखल केलेला प्रस्ताव.

महोदय / महोदया,

१. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन विविध आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील नविन पदवी महाविद्यालय/नविन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे / विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे / संस्था मान्यता इत्यादी करीता विहीत शुल्कासह प्रस्ताव अर्ज विद्यापीठास सादर करण्यासाठी, विद्यापीठाने संकेतस्थळावर व अग्रगण्य वृत्तपत्रांमध्ये विद्यापीठ शैक्षणिक अधिसूचना क्र. २९/२०२४ दि.१७/०५/२०२४ रोजी प्रसिध्द केली होती.

२. उपरोक्त विषयांकीत नमुद संस्थेने उक्त नमुद अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरु करण्यासाठी मआविवि अधिनियम १९९८, कलम ६४ नुसार विद्यापीठाकडे संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे.

३. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी उपरोक्त अधिसूचनेनुसार अर्ज मागविण्यात आले असतील तरी सदर अर्ज संबधीत केंद्रीय परिषदेकडे त्यांनी विहीत केलेल्या दिनांकापूर्वी सादर करणे शक्य होत नसल्याने, सदर प्रस्ताव पुढील वर्षासाठी म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रक्रीयेकरीता ग्राहय धरले जातात. त्याअनुषंगाने संबधीत महाविद्यालयांच्या प्रस्तावावर प्रक्रीया करणेसाठी एका शैक्षणिक वर्षाचे नुकसान होते.

४. यास्तव संस्थेने सादर केलेल्या सदर प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांची विद्यापीठाच्या नियोजन मंडळाने छाननी केली असता, सदर प्रस्ताव व त्यासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या आधारे, यासंदर्भात उपरोक्त विषयावर दि.२१/०८/२०२४ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली असता, खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. २८९(ब)/२०२४**

नविन पदवी महाविद्यालय/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणेसाठी प्राप्त प्रस्तावांपैकी खालील नमुद विद्याशाखानिहाय एकुण ०७ संस्था / महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांची त्रुटीपुर्तता करुण घ्यावी. त्रुटीपुर्ततेबाबतची माहिती/कागदपत्रे /दस्ताऐवज अभिसारण पद्धतीने नियोजन मंडळापुढे सादर करुन सदर संस्था / महाविद्यालये/केंद्रीय परिषदेने/ शासनाने / विद्यापीठाने निश्चीत केलेल्या मानकांनुसार कागदपत्रांची /दस्तऐवजांची पुर्तता करीत असल्याबाबत नियोजन मंडळाची खात्री करुण घ्यावी. तद्नंतर सदर प्रस्तावांची मआविवि अधिनियम १९९८ मधील कलम ६४ (४) अंतर्गत शिफारस करणेसाठी मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

त्यानुसार उपरोक्त महाविद्यालयाने परिचर्या परिषदेने/ विद्यापीठाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार, आवश्यक बाबींची त्रुटी पुर्तता केली असल्याने दि.२६/०९/२०२४ रोजी नियोजन मंडळाने अभिसारण पद्धतीने सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. (उक्त प्रस्तावाची प्रत संलग्न)

करिता विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२७ च्या **बृहत आराखडयानुसार** उपरोक्त विषयांकीत संस्थेचे प्रस्तावित ठिकाणी बी.एस्सी नर्सिंग या अभ्यासक्रमाचे **नविन महाविद्यालय सुरु करण्याची तरतूद आहे.** त्याअनुषंगाने विषयांकित संस्थेच्या प्रस्तावावर विविध प्राधिकरणांद्वारे कार्यवाही करुन शासन मान्यतेच्या अधिन राहुन, **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन** ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. २८९/२०२४ अन्वये **राज्य शासनास याद्वारे शिफारस करण्यात येत आहे.**

विद्यापीठास सादर केलेला सदर प्रस्ताव पाच वर्षासाठी म्हणजे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पर्यंत वैध राहील. तथापि, सदर प्रस्तावाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विहित शुल्क अधिसुचना क्र. ४२/२०१७ (सुधारित) अन्वये विद्यापीठास अदा करुन शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पावेतो प्रत्येक वर्षा करिता प्रस्ताव पुनर्जीवीत करुन घेणे बंधनकारक असेल.

आपला स्नेहांकित,

26-9-24

कुलसचिव

**प्रत :-**

**मा. अध्यक्ष / सचिव,**
माणगांव शिक्षण प्रसारक मंडळ,
कचेरी रोड,माणगांव,ता.माणगांव,
जि. रायगड- ४०२ १०४

१. मा. व्यवस्थापन परिषदेने केलेली उपरोक्त शिफारस ही आपल्या संस्था / महाविद्यालयातील शैक्षणिक सोयी सुविधा व अन्य आवश्यक बाबींची प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे केलेली नसून, आपण प्रस्तावासोबत सादर केलेले दस्तावेज / कागदपत्रे यांच्या आधारे केलेली आहे. याबाबत भविष्यात या संदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण / वाद किंवा अन्य कोणतेही प्रश्न उद्भवल्यास त्याबाबत, आपली संस्था / महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.
२. आपल्या प्रस्तावास राज्य शासनाचा शासन निर्णय (GR) आणि तद्नंतर विद्यापीठाचे पहिल्या वेळेचे संलग्नीकरण (First Time Affiliation) प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी व त्याप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.